24 OCT 2021 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महामानव' कृतज्ञतेने ओथंबलेला : शिर्के



कोल्हापूर : 'महामानव ग्रंथा'चे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. एस. महाजन आदी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील २०२१ कवितांचा समावेश असलेला महाकाव्य ग्रंथ कृतज्ञतेने ओथंबलेला आहे, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

तरोडा खुर्द, जि. नांदेड येथील प्रा. अशोककुमार दवणे यांनी संपादित केलेल्या 'महामानव' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीच्या २०२१ कवितांचा समावेश असलेल्या महाकाव्य ग्रंथाचे राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी प्रकाशन करण्यात आले. कोल्हापूर येथील प्रकाशन सोहळा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ कार्यालयात झाला. डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत केले. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी आभार मानले.

24 OCT 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भावी पिढ्यांना जीवनमूल्ये शिकवणारा 'बापू स्मृतिग्रंथ'

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शेती हाच ध्यास असणारी व्यक्ती म्हणजे गोटखिंडीचे गजानन बळवंत पाटील तथा बापू. हल्लीच्या काळात आपण अनेक जीवनमूल्ये हरवून बसलो आहोत असे वाटते; पण स्वतःच्या कुटुंबाबरोबर दुसऱ्याची काळजी कशी घ्यावी, हा धर्म बापूंनी जपला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. टी. शिर्के यांनी केले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या सभागृहात 'बापू स्मृतिग्रंथ प्रकाशन समारंभ'प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे होते.



**बापू स्मृतिग्रंथ प्रकाशनप्रसंगी युवराज कदम, डॉ. दिलीप पाटील, रत्नप्रभा पाटील, के. जी. पाटील, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. डी. टी. शिर्के, वैभवकाका नायकवडी, डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

या समारंभात 'वाचनकट्टा'चे युवराज कदम, डॉ. व्ही. जी. पाटील, डॉ. ए. ए. कलगोंडा, प्रा. अविनाश पाटील व दिलीप पाटील यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. विनय पाटील यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ. कविता गगराणी व डॉ. विजयाराणी पाटील यांनी केले. डॉ. मनीषा नायकवडी यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. चेअरमन के. जी. पाटील, अध्यक्ष बी. जी. बोराडे, हुतात्मा उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख वैभवकाका नायकवडी, अनु आसगावकर, डी. जी. किल्लेदार, सतीश पाटील, राजेंद्र पाटील, न्यू कॉलेजचे प्रा. व्ही. एम. पाटील, प्रा. सी. एम. गायकवाड, सेक्रेटरी रणजित शिंदे, जि. प. सदस्य शिवाजीराव मोरे, शाहीर आझाद नायकवडी, लाला गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

24 OCT 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांघिक प्रकारात औरंगाबादचे वर्चस्व

## राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धा ; महिला व पुरुष गटात सुवर्ण सांगली दुसऱ्या स्थानी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात ३२ व्या राज्यस्तरीय फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेस शनिवारी शानदार सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी औरंगाबाद संघाच्या पुरुष व महिला संघांनी ईपी प्रकारात सांघिक सुवर्णपदक पटकावित वर्चस्व राखले.

ईपी प्रकारात पुरुष गटात प्रथम क्रमांक औरंगाबाद संघाने पटकाविला. यात सय्यद शेकर अंबीर, दुर्गेश मिलिंद जहागिरदार, ऋषभ बाळासाहेब जाधव, यश संजीव वाघ यांचा समावेश आहे. या संघाने सुवर्ण पदक पटकाविले. तर सांगली संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. या संघात गिरीश जकाते, श्रेयस तांबवेकर, मोरेश्वर पाटील, किशोर पिराय (सर्व रौप्य) यांचा समावेश आहे. तर, भंडारा संघाकडून चेतन वाकेकर, निखिल कोहाड, सौरभ तोमर, अमन विरागडे यांचा समावेश आहे. गोंदिया संघाकडून अक्षय बनकर, प्रतीक लाडेकर, रितिक कात्रे यांचा समावेश आहे. या दोन्ही संघांना तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

मुलींमध्ये ईपी प्रकारात औरंगाबाद संघाने सुवर्ण पदक पटकाविले. या संघात विशाखा काजळे, हर्षदा वडते, स्नेहल पाटील, गायत्री कदम यांचा समावेश आहे.

अहमदनगर संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. या संघात वैष्णवी गोडळकर, भक्ती कोरडे, श्रुती जाधव, ऋतुजा भवर (सर्व रौप्य), तर तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या पालघर संघात नर्मथा यादव, रोचेली पी. डिसूझा, अनुजा लाड, वामा मणियार यांचा, तर लातूर संघात ज्ञानेश्वरी माधव, बिस्मिल्ला शेख, माही अरदवाड, दिव्यांका कदम यांचा समावेश आहे. दोन्ही संघांनी संयुक्तरीत्या तिसरे स्थान पटकावित कांस्य पदक पटकाविले.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या सभागृहात ३२ व्या राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी झाले. यावेळी स्पर्धेतील क्षण पाहताना शाहू छत्रपती, पालकमंत्री सतेज पाटील, कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, डॉ. राकेशकुमार मुदगल, डॉ. शिंपा शर्मा, डॉ.पी.एस.पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते. (छाया :आदित्य वेल्हाळ)

### तलवारबाजी स्पर्धा सर्वांसाठी खुली

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात प्रथमच राज्यस्तरीय फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेचे आयोजन होत आहे. यापूर्वी केवळ मोठ्या शहरात या स्पर्धा होत होत्या. यंदा कोल्हापूरला यजमानपद दिले आहे. त्यामुळे हा खेळ तीन प्रकारात खेळला जातो. त्यातील बारकावे जवळून पाहण्याची संधी क्रीडाप्रेमींना आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र फेन्सिंग महासंघाचे अध्यक्ष, पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले आहे.

लोकमत

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील महाकाव्याचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील महाकाव्याचे शनिवारी राज्यात एकाचवेळी ३६ जिल्ह्यांत कुलगुरू व जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रकाशन झाले. नांदेड तरोडा येथील ज्येष्ठ कवी प्रा. अशोकराव दवणे यांनी हे महाकाव्य संपादित केले आहे. कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ डी. टी. शिर्के यांच्या हस्ते, क्रास्टाईबचे राज्य महासचिव नामदेव कांबळे, प्र- कुलगुरु पी. एस. पाटील, आंबेडकर संशोधन समितीचे डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. यावेळी कुलगुरू शिर्के यांनी हे महाकाव्य कृतज्ञतेने ओथंबलेले आहे, असे गौरवोद्‌गार काढले. ५ हजार कवितांमधील निवडक २०२१ कवितांचा अभ्यास शिवाजी विद्यापीठातील अभ्यासक, विद्यार्थी, नवोदित साहित्यिक यांच्यासाठी उपलब्ध असणार आहे. यावेळी विद्यामंदिर शिये शाळे कवी डी. एस. कौशल, कळे कॉलेजचे प्रा. जेलित कांबळे, प्रा. प्रेरणा व्यवहारे, क्रास्टाईबचे जिल्हाध्यक्ष गौतम वर्धन, संजय कुर्डूकर, आदी उपस्थित होते.

24 OCT 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाच जिल्ह्यांत फेन्सिंगसाठी डेडिकेटिव्ह हॉल उभारणार

## पालकमंत्री पाटील : ३२ व्या राज्यस्तरीय फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेला सुरुवात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात फेन्सिंग (तलवारबाजी) खेळाला प्रोत्साहन मिळावे, या खेळातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी खेळाडूंना उपलब्ध व्हावी, यासाठी राज्यातील पाच जिल्ह्यांत फेन्सिगसाठी डेडिकेटिव्ह हॉल निर्माण करण्यात येणार आहेत. या हॉलसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून व महाराष्ट्र फेन्सिग असोसिएशनच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले.

३२ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट फेन्सिग अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.




**कोल्हापूर : ३२ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना शाहू महाराज. सोबत पालकमंत्री सतेज पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राकेशकुमार मुदगल, क्रीडा उपसंचालक संजय सबनीस, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे आदी.** **(छाया : पप्पू अत्तार)**

महाराष्ट्र फेन्सिग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ, डी.वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर फेन्सिग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह येथे सुरू आहे. स्पर्धेचे उद्घाटन पालकमंत्री सतेज पाटील व शाहू महाराज यांच्या हस्ते झाले.

पालकमंत्री पाटील म्हणाले, फेन्सिग स्पर्धेसाठी कोल्हापुरातील खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यासाठी प्रयत्न करतील. या स्पर्धेतून २४ खेळाडूंची पटियाला येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. कोणताही होतकरू खेळाडू आर्थिक परिस्थितीमुळे मागे राहणार नाही, अशा खेळाडूस असोसिएशनमार्फत दत्तक घेतले जाईल.

शाहू महाराज म्हणाले, तलवारबाजी पारंपरिक पद्धतीने खेळला जाणारा खेळ आता आधुनिक पद्धतीने खेळला जात आहे. फेन्सिगमध्ये राज्यातून ऑलिम्पिकसाठी खेळाडू घडावेत, त्यासाठी शासनाने खेळाडूंना सर्व सोयीसुविधा द्याव्यात.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डी. वाय.पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल यांनीही मनोगत व्यक्त केले. प्र. कुलगुरू डॉ. पी.एस.पाटील, प्र. कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, क्रीडा उपसंचालक संजय सबनीस, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे, महाराष्ट्र फेन्सिग असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रकाश काटोळे, सचिव उदय डोंगरे, सल्लागर अशोक दुधारे, खजिनदार राजकुमार सोमवंशी, विनय जाधव उपस्थित होते.

पुढारी

# यूजीसी-नेट परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राष्ट्रीय परीक्षा मंडळाने (एनटीए) सहायक प्राध्यापक पदासाठीच्या यूजीसी-नेट परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. डिसेंबर आणि जूनमध्ये ही परीक्षा होणार आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे नेट परीक्षा लांबणीवर पडली होती. त्यामुळे देशभरातील उमेदवारांकडून यूजीसी नेट २०२० आणि यूजीसी नेट २०२१ या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर एनटीएकडून वेळापत्रक जाहीर करण्यात आले. २० ते ३० नोव्हेंबर आणि १ ते ५ डिसेंबरमध्ये परीक्षा होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. यासंदर्भातील अधिक माहिती संकेतस्थळावर देण्यात आल्याचे एनटीएकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# विद्यापीठाचा पर्यटन आराखडा

## सहली, अभ्यास दौऱ्यांना संधी; परिसरातील जैवविविधतेची होणार ओळख

**ऑंकार धर्माधिकारी** : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने समृद्ध आहे. या जैवविविधतेची ओळख सर्वांना व्हावी यासाठी विद्यापीठाचा पर्यटन आराखडा तयार केला जाणार आहे. भूगोल विभागातील टूर्स अँड ट्रॅव्हल कोर्सच्या अध्यापक, विद्यार्थी यांच्याकडे हे काम देण्यात आले आहे. लवकरच हा आराखडा मूर्तरूपात येऊन विद्यापीठात पर्यटन सहलींचे आयोजन केले जाईल.

शिवाजी विद्यापीठाला ५५८ एकरचा परिसर लाभला आहे. ही केवळ जमीन नसून येथे विद्यापीठातील विद्यार्थी, प्रशासनाने पर्यावरण संवर्धनाचे विविध प्रयोग केले आहेत. शेततळी, तलाव, विहिरी यांच्या माध्यमातून विद्यापीठ पाण्याबाबत स्वयंपूर्ण आहे. मोठ्या प्रमाणात झालेल्या वृक्षारोपणामुळे येथे विविध प्रकारचे कीटक, पक्षी, सरीसृप, मासे पाहायला मिळतात. याशिवाय बॉटनिकल गार्डनमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील दुर्मिळ वृक्षदेखील जतन करून ठेवले आहेत. लवकरच विद्यापीठात क्रांतिवन, राजर्षी शाहू महाराज जीवनकार्य चित्रप्रदर्शिनी, ओपन थिएटर, वैज्ञानिक प्रयोग प्रदर्शनी होणार आहे. याशिवाय विद्यापीठाच्या ऑडिटोरीयममध्ये विविध विषयांवरील लघुपट, माहितीपट दाखवण्याची सुविधा आहे.

या सर्वांचा विचार करून विद्यापीठ परिसराचा पर्यटन आराखडा बनवण्याचे काम सुरू आहे. हा आराखडा तयार झाला की शाळांच्या शैक्षणिक सहली येथे येऊ शकतात. परजिल्ह्यातील पर्यटकांनाही येथे अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. याची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करून दिली जाणार आहे.



**“ शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा जैवविविधनेते व्यापलेला आहे. विद्यापीठातील बॉटनिकल गार्डन, अध्यासने यांच्याबरोबरच जलसंधारणाचा प्रकल्पही पाहण्यासारखा आहे. त्यामुळे या परिसराचा विस्तृत आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. लवकरच आराखडा पूर्ण होऊन प्रत्यक्ष पर्यटनाला सुरुवात होईल.**
**- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

### वर्षा पर्यटन अनुभवाच

विद्यापीठामध्ये मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे झाली आहेत. मोठे तलाव, शेततळी, उंच भागावरून खळखळत येणारे छोटे धबधबे, हिरवागार परिसर असे मनोहारी दृश्य पावसाळ्यात विद्यापीठात पाहायला मिळते. याच काळात विविध प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांमुळे येथील माळ बहरून जातात. विद्यापीठातील वर्षा पर्यटन अनुभवण्यासारखेच आहे.

### काय असेल पर्यटनात...

- जैवविविधता (प्राणी, पक्षी, वनस्पती)
- बोटॅनिकल गार्डन
- विद्यापीठाची रोपवाटिका
- वि. स. खांडेकर संग्रहालय
- शाहू महाराजांचे जीवनकार्य दर्शवणारी चित्रप्रदर्शनी
- वैज्ञानिक प्रयोगांचे प्रदर्शन
- जलसंधारण प्रकल्प (तलाव, शेततळी, विहिरी)
- कचऱ्यापासून गॅसनिर्मिती प्रकल्प
- विविध उद्याने
- क्रांतिवन
- विविध विषयांवरील लघुपट, माहितीपट
- सेंटर ऑफ एक्सलन्स, इन्क्युबेशन इन सेरी कल्चर

24 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फेन्सिंग संकुल उभारणार

## सतेज पाटील : जिल्हा वार्षिक योजनेतून निधीसाठी पुढाकार घेणार

कोल्हापूर, ता. २३ : राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये तलवारबाजीसाठी स्वतंत्र अद्ययावत संकुल निर्माण करण्यात येणार असल्याची घोषणा पालकमंत्री सतेज पाटील यांनी आज येथे केली. ३२ व्या राज्यस्तर वरिष्ठ गट फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशन स्पर्धेचे संयोजक आहेत. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात स्पर्धा सुरू आहे. या वेळी श्री. पाटील म्हणाले, "कोरोना संकटातून बाहेर पडत असताना दोन वर्षांत प्रथमच राज्यस्तरावरील मोठी स्पर्धा होत आहे. प्रतिवर्षी पाच जिल्ह्यांप्रमाणे संपूर्ण राज्यात फेन्सिंगसाठी अद्ययावत संकुल बांधू. त्यासाठी जिल्हा वार्षिक योजना व महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनच्या माध्यमातून निधी उभारू. खेळाडूंना असोसिएशनकडून दत्तक घेऊन आर्थिक पाठबळ दिले जाईल. डीपीडीसीमधून या क्रीडा प्रकारासाठी साहित्य उपलब्ध करून देणारा कोल्हापूर पहिला जिल्हा आहे." अशाच प्रकारे अन्य जिल्ह्यांनीही निधी द्यावा, यासाठी सर्व पालकमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे. तुमच्या सूचनांचेही स्वागत असल्याचे सांगत श्री. पाटील यांनी आपला मोबाईल क्रमांक जाहीर केला. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनीही मनोगत व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, क्रीडा उपसंचालक संजय सबनीस, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे, असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रकाश काटोळे, सचिव उदय डोंगरे, सल्लागार अशोक दुधारे, खजिनदार राजकुमार सोमवंशी, संयोजन समिती अध्यक्ष संजय जाधव, विनय जाधव, डॉ. बाबासाहेब उलपे उपस्थित होते.




**कोल्हापूर : येथे शनिवारी राज्यस्तर फेन्सिंग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, मंत्री सतेज पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राकेशकुमार मुदगल, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. शिंपा शर्मा, संजय सबनीस, डॉ. चंद्रशेखर साखरे, प्रकाश काटोळे, बाबासाहेब उलपे आदी.**

### औरंगाबादचे वर्चस्व

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी ईपी सांघिक प्रकारामध्ये औरंगाबादच्या महिला व पुरुष संघाने सुवर्णपदक पटकाविले. पुरुष गटात सांगलीने द्वितीय तर भंडारा आणि गोंदिया संघाला विभागून तिसरा क्रमांक देण्यात आला. मुलींमध्ये नगर संघाने द्वितीय तर पालघर आणि लातूर संघाने तिसरे स्थान मिळविले.

24 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शासनाने ऑलिम्पिकच्या तोडीचे तलवारबाज घडवावेत

## शाहू महाराज छत्रपती यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेला प्रारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्रातील खेळाडूंना तलवारबाजीचे आधुनिक प्रशिक्षण द्यावे असे प्रतिपादन शाहू महाराज छत्रपती यांनी शनिवारी येथे केले. आंतरराष्ट्रीय स्पर्धांसह ऑलिम्पिकपर्यंत पोहोचवण्यासाठी शासनाने विविध योजना राबवून त्यांच्या माध्यमातून सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे नितांत गरजेचे आहे. खेळाडूंनीही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत प्रतिनिधीत्व करण्याचे लक्ष्य डोळ्यासमोर त्यादृष्टीने कराव्या लागणाऱ्या सरावात झोकून द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यापीठातील जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृहात आयोजित ३२ व्या वरिष्ठगट राज्यस्तर फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशन यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.




**कोल्हापूर : वरिष्ठ गट राज्यस्तर तलवारबाजी स्पर्धेचे उद्घाटन करताना श्रीमंत शाहू महाराज छत्रपती. शेजारी पालकमंत्री सतेज पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. राकेशकुमार मुदगल, डॉ. शिंपा शर्मा, संजय सबनीस, डॉ. चंद्रशेखर साखरे, प्रकाश काटोळे व उदय डोंगरे आदी.**

हलगीच्या ठेक्यावर शाहू महाराज यांनी दिपप्रज्वलन करत स्पर्धेचे उद्घाटन केले. यावेळी राष्ट्रीय तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष तथा पालकमंत्री सतेज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र-कुलगुरु डॉ. शिंपा शर्मा, विभागीय क्रीडा उपसंचालक संजय सबनीस, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे, महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रकाश काटोळे, सचिव उदय डोंगरे व कोल्हापूर फेन्सिंग (तलवारबाजी) असोसिएशनचे सचिव विनय जाधव आदि उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, तलवारबाजीला चालना देण्यासाठी विशेष पाऊल उचणार असून राज्यातील पाच जिल्ह्यात तलवारबाजी डेडीकेटीव्ह हॉल तयार केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. शौर्याची भूमी असलेल्या कोल्हापूरात तलवारबाजी राज्यस्तरीय स्पर्धा आयोजनाचे यजमानपद मिळवून तलवारबाजीच्या प्रसार व प्रचाराला आता सुरुवात केली आहे. भविष्यात तलवारबाजीचा प्रसार करत असताना होतकरु खेळाडू आर्थिक चणचणीमुळे मागे राहणार नाही याचीही दक्षता घेतली जाईल. इतकेच नव्हे तर होतकरु खेळाडूंना असोसिएशनमार्फत दत्तक घेऊन तलवारबाजीचे आधुनिक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाईल. शिवाय तलवारबाजीचा विकास करण्यासाठी चांगल्या योजना हाती घेतल्या जातील, अशी अशी ग्वाहीही पालकमंत्री पाटील यांनी दिली. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राकेशकुमार मुदगल यांचीही भाषणे झाली. महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे सचिव उदय डोंगरे यांनी प्रास्ताविक करत स्पर्धेची संपुर्ण रुपरेषा सांगितली. स्पर्धा संयोजन समिती अध्यक्ष संजय जाधव यांनी आभार मानले.

24 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : राज्यस्तरीय तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेला शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृहात प्रारंभ झाला. या स्पर्धेत प्रत्येक क्षणाला एकमेकांवर मोठ्या चपळाईने आक्रमक चाली करुन गुण मिळविण्यासाठी खेळाडूंमध्ये जणू युद्धच रंगले होते. अशाच एका युद्धातील एक रोमांचकारी क्षण. (छाया : इम्रान गवंडी)

Times of India

# State-level senior fencing championship starts

Rahul.Gayakwad@timesgroup.com

Rahul Gayakwad



The tournament is being held at the Rajmata Jijausaheb Multipurpose Hall in Shivaji University, Kolhapur

**Kolhapur:** Shahu Chhatrapati Maharaj, a member of the Kolhapur royal family, and Kolhapur guardian minister Satej Patil inaugurated the 32nd state-level senior fencing championship 2021-22 at the Rajmata Jijausaheb Multipurpose Hall in Shivaji University, Kolhapur on Saturday.

The tournament, which will go on till October 25, has more than 500 fencers across universities from the state taking part. Maharashtra Fencing Association, Kolhapur Fencing Association, D Y Patil Autonomous University and Shivaji University, Kolhapur have jointly organised the tournament.

Patil, who is also the head of the Maharashtra Fencing Association, said, "To make fencing one of the top sports in Maharashtra, every yea,r five districts will be selected to create a fencing stadium, especially for fencing practise and matches. Given the Covid situation, such kind of a tournament is being held for the first time and all the precautions are being taken. Kolhapur is a historic city and I am sure that the players participating in the tournament will participate in Asian Games and Olympics."

While addressing the young sportspersons, Shahu Chhatrapati Maharaj said, "Fencing is similar to using a sword which has a historical root in India. The government needs to provide support to other sports along with popular sports like cricket."

More than 500 fencers, who have represented at state, national and international levels, are participating in the tournament.

Yogesh Kulkarni from Vasundhara Mahavidyalay Parbhani, said, "For the past one-and-half year, we were away from sports due to the pandemic. Now, the championship is being held in Kolhapur and we are excited to get back in action."

SUK Chancellor D T Shirke, vice-chancellor P S Patil, vice-chancellor of DY Patil autonomous university Dr Shimpa Sharma, district sports officer Chandrashekhar Sakhare and other dignitaries were present for the inauguration.